| MHSN05000742-2022 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ०२.०३.२०२२ |
| | नोंदणी तारीख | : | ०२.०३.२०२२. |
| | निकाल तारीख | : | २२.०१.२०२६. |
| | कालावधी **०३** व. **१०** म. **२०** दि. | | |

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २७५/२०२२**

**निशाणी क्रमांक १६/क सोबत**

**(न्यायनिर्णय)**

अभिलेखावरील पुरावा वाचला. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील आणि आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद लक्षात घेऊन खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले आहेत. सदर मुद्यांवर निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नमूद केली आहेत–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, दिनांक २२.११.२०१९ रोजी १२.१५ च्या सुमारास भडकंबे–बहादूरवाडी रोड, भडकंबे, ता. वाळवा, जि. सांगली येथे आरोपीच्या ताब्यात देशी दारुच्या १८० मिली प्रत्येकीच्या ३० बाटल्या बेकायदा, बिगर परवाना विक्री करणेच्या उद्द्देशाने जवळ बाळगुन असताना मिळुन आला? | | **नकारार्थी** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** | |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबत –**

२. आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१ आनंदा बुवाजी शेळके हा एकमेव साक्षीदार तपासला आहे. निशाणी १ कडे आदेश पारित करुन पूरावा बंद केला आहे.

३. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ आनंदा बुवाजी शेळके यांच्या सरतपासात असे आले आहे की, दिनांक २२.११.२०१९ रोजी राज्य उत्पादन शुल्कच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना सांगली येथील त्यांचे कार्यालयात सही करण्यासाठी बोलावले होते. त्या ठिकाणी त्यांनी पंचनाम्यावर सही केली. त्या दिवशी राज्य उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या समक्ष पंचनामा करुन आरोपीच्या ताब्यातून देशी दारु संत्राच्या १८० मिलीच्या ३० बाटल्या जप्त केल्या असे काही घडले नाही.

४. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी उलट तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारले परंतु, आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द होईल असा कोणताही पुरावा सदर साक्षीदाराच्या साक्षीमधून अभिलेखावर आला नाही. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही.

५. प्रस्तुत कामी दुसरा साक्षीदार संतोष आनंदा कोठावळे हा मयत असल्याबाबत मृत्युप्रमाणपत्र समन्स रिपोर्ट सोबत दाखल आहे. तो नि.१९ वर आहे. सदर प्रकरणात नि.२० वर सी.ए. रिपोर्ट दाखल आहे. परंतु, आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त झाल्याबाबत पंचनामा सिध्द झालेला नाही. सदर

प्रकरणात फिर्याद सिध्द झालेली नाही. तसेच, वाहकाचा जबाब अभियोग पक्षाने नोंदविलेला नाही.

६. अभियोग पक्षाला पुरेसी संधी देऊन ही अभियोग पक्षाने प्रस्तुत कामातील इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. एकंदरीत साक्षीदार क्र. १ यांचा तोंडी पुरावा आरोपीला नमूद गुन्ह्यासाठी दोषी धरण्यासाठी पुरेसा नाही. जप्त मुद्देमालाच्या रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभियोगपक्षाने याकामी दाखल केलेला असला तरीही तो अहवाल दारुचा अहवाल आहे व सदर दारु आरोपीच्या ताब्यातून मिळून आली होती ही बाब संशयापलिकडे सिध्द होत नाही. अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणातील सॅम्पल घेवून जाणाऱ्या वाहकाचा जबाब नोंदविलेला नाही. वर नमुद साक्षीदारांच्या पुराव्या व्यतिरिक्त इतर कुठल्याही महत्वाच्या साक्षीदाराचा पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. आरोपीविरुध्द गुन्हा संशयापलीकडे सिध्द होईल असा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. प्रस्तुत कामी जप्ती पंचनामा स्वतंत्र साक्षीदाराच्या साक्षीतून सिध्द करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर गुन्ह्यात मुद्देमाल जप्त केला तसेच जप्त मूद्देमाल हा देशी दारु होती व ती आरोपीच्या ताब्यातून जप्त झाली हे संशयापलीकडे सिध्द झालेले नाही. सबब, अभियोग पक्षाने हजर केलेला पुरावा आरोपी हा कथित दिनांक, वेळी व ठिकाणी नमूद मुद्देमाल बाळगून होता हे संशयापलिकडे सिध्द करीत नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन, मुद्दा क्रमांक २ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी प्रकाश सदाशिव कुलकर्णी, रा. भडकंबे, ता. वाळवा, जि. सांगली याची फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २५५(१) अन्वये मुंबई दारु |

| | |
|---|---|
| | प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीने दिलेला वैयक्तिक जात मुचलका रद्द करण्यात येतो. |
| ३. | जप्त मुद्देमाल अपीलाचा कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास, नियमाप्रमाणे दारुबंदी अधिकाऱ्यामार्फत नष्ट करावा. |
| ४. | आरोपीला असा आदेश देणेत येतो की, त्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/– चा वैयक्तिक जामीन व त्याच किंमतीचा जात मुचलका द्यावा. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला). |

MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY

Digitally signed by MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY
Date: 2026.01.22 16:47:48 +0530

ठिकाण:– इस्लामपूर. (मृण्मयी मु. चौधरी)

दिनांक –२२.०१.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इस्लामपूर

कोर्ट नं.१

| -:CERTIFICATE:- | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file order is same word as per original order. | | |
| Name of Stenographer | :- | Satish N. Pethkar, |
| Court Name | :- | Mrunmayee M. Choudhary.<br>Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C.,<br>Islampur |
| Date of decision | :- | 22.01.2026. |
| Order signed by P.O. on | :- | 22.01.2026. |
| Order uploaded on | :- | 22.01.2026. |